गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक २५० वा ● बुधवार ३१ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

* Volume 1 | Issue 250 | Date : 31/01/2024 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना सन २०२३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

मुंबई : महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा सन २०२३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. आज यासंदर्भातील घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रुपये २५ लाख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. अशोक सराफ यांनी नाटक आणि चित्रपटांच्या माध्यमातून केलेल्या कला क्षेत्रातील कामगिरीचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह विविध मान्यवरांनी या पुरस्काराबद्दल अभिनेते अशोक सराफ यांचे अभिनंदन केले आहे.



महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्य शासनाकडून देण्यात येणारा हा सर्वात मोठा पुरस्कार आहे. आरोग्यसेवा, उद्योग, कला, क्रीडा, पत्रकारिता, लोकप्रशासन, विज्ञान आणि समाजसेवा या क्षेत्रांत केलेल्या विशेष योगदानासाठी हा पुरस्कार दिला जातो. या क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव देशात आणि जगभर नेणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यास सन १९९५ पासून सुरुवात झाली. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या नाट्य -चित्रपट क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. आपल्या विनोदी शैलीने त्यांनी अनेक चित्रपटातून रसिकांना खळखळून हसायला लावले. त्याचबरोबर, संवेदनशीलतेने भूमिका साकारताना रसिकांना आपल्या अभिनयाने मंत्रमुग्ध केले. त्यांच्या अभिनयाचे गारुड मराठी चित्रपटरसिकांवर आजही कायम आहे.

अशोक सराफ हे मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी आणि दमदार अभिनेता म्हणून । पान २ वर

## १४६ विरोधी खासदारांचे निलंबन रद्द, सरकारचा निर्णय

नवी दिल्ली : संसदेचे शेवटचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन अंतरिम अर्थसंकल्प सादर करणार आहेत. दरम्यान, संसदेच्या मागील हिवाळी अधिवेशनात निलंबित करण्यात आलेल्या सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांचे निलंबन रद्द करण्यात येणार असून हे सर्व खासदार उद्या ३१ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहभागी होऊ शकणार आहेत. अधिवेशनापूर्वी झालेल्या



सर्वपक्षीय बैठकीनंतर संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात १४६ विरोधी खासदारांना संसदेतून निलंबित करण्यात आले होते.

विरोधी पक्षाच्या खासदारांचे निलंबन मागे घेण्याची विनंती सरकारने लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींना केल्याचे जोशी यांनी सांगितले. काही विरोधी खासदारांचे निलंबन हिवाळी अधिवेशनापर्यंतच होते, मात्र, काहींचे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवण्यात आल्याचे ते म्हणाले. ते म्हणाले की, विशेषाधिकार समितीशी बोलल्यानंतर विरोधी खासदारांचे निलंबन रद्द करण्याची विनंती करण्यात आली, ज्याला लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सभापतींनी सहमती दर्शवली. संसदेच्या सुरक्षेतील त्रुटींबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विधानाची मागणी करत गोंधळ घातल्याप्रकरणी एकूण १४६ विरोधी खासदारांना संसदेतून निलंबित करण्यात आले. । पान २ वर

## पंतप्रधान मोदी १९ फेब्रुवारीला पुणे दौऱ्यावर

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ फेब्रुवारी रोजी पुणे दौऱ्यावर येत आहेत. चार महिन्यात मोदी यांचा हा तिसरा पुणे दौरा होत असल्याने पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी मोदी चाचपणी करत असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे. पुण्यातील नवीन विमानतळाच्या टर्मिनलचे उद्घाटन आणि महात्मा फुले स्मारकाचे उद्घाटन मोदींच्या हस्ते होणार आहे. याशिवाय मोदींच्या हस्ते मेट्रो मार्गिकेचेही उद्घाटन होणार आहे. शिवाय पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा देखील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १९ फेब्रुवारीला शिवजयंती असल्याने पंतप्रधान मोदी शिवनेरी किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळावर नतमस्तक होणार असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणूक उत्तर प्रदेशमधील वाराणसीच्या बरोबरच पुणे लोकसभा मतदारसंघातून लढविण्यासाठी मोदी स्वतःच चाचपणी करत असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्रात भाजपला मोठा फटका बसणार असे सर्वेक्षणात निदर्शनास आल्याने भाजपची ही नवी खेळी आहे, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात आहे.१ ऑगस्ट २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टिळक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या निमित्ताने ते शहरात आले होते. नंतर ऑक्टोबरमध्ये त्यांचा एक धावता दौरा झाला. गेल्याच महिन्यात मुंबई येथील विविध प्रकल्पांचे उद्घाटनासाठीही ते आले होते. आता पुन्हा पुणे शहर दौऱ्यावर येत असल्याने तो चर्चेचा विषय ठरला आहे. लोकसभा निवडणुका मार्च अखेरीस जाहीर होतील आणि एप्रिलमध्ये मतदान व निकाल लागेल.



## मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषण करणार

रायगड : मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून सगेसोयरे संदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटलांनी केली आहे. मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. यावरून मनोज जरांगे पाटलांनी आता सरकारला इशारा दिला आहे. आज रायगड येथे मनोज जरांगे पाटील गेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचं जाहीर केलं.



आज महाराष्ट्रातील मराठा समाजाला आणि सरकारला महत्त्वाचं सांगायचं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की सगेसोयऱ्यांची जी अधिसूचना काढली आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाली पाहिजे. तुम्ही हरकती-सूचना मागितल्या असल्या तरी तातडीने अंमलबजावणी होणं आवश्यक आहे, असं मनोज जरांगे म्हणाले.

पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून सगेसोयऱ्यांच्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करा. तसंच, तातडीने उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू नाही केली तर १० फेब्रुवारीला बेमुदत उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.या कायद्याची अंमलबजावणी वेळेत केली नाही किंवा दडपणाखाली जबाबदारी पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाहीत, समितीला मुदतवाढ दिलेली असतानाही समिती काम करत नाही. । पान २ वर

## केरळमधील भाजप नेत्याच्या हत्येप्रकरणी १५ जणांना फाशी

केरळ : केरळमधील भाजप नेते रंजित श्रीनिवासन यांच्या हत्येप्रकरणी मावेलिक्कारा अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने आज १५ दोषींना फाशीची शिक्षा सुनावली. सर्व आरोपी हे पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) त्याची राजकीय शाखा असणाऱ्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सदस्य आहेत. सर्व आरोपींना न्यायालयाने २० जानेवारी २०२४ रोजी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ (हत्या) अंतर्गत दोषी ठरवले होते. रंजित श्रीनिवासन हे केरळमधील भाजप ओबीसी मोर्चाचे राज्य सचिव होते. १९ डिसेंबर २०२१ रोजी अलाप्पुझा नगरपालिकेतील वेल्लाकिनार येथे त्यांच्या घरात घुसून हल्लेखोरांनी कुटुंबासमोर त्यांची हत्या केली होती. या प्रकरणी नसम, अजमल, अनुप, मोहम्मद अस्लम, अब्दुल कलाम ऊर्फ सलाम, अब्दुल कलाम, सफारुद्दीन, मंशाद, जसीब राजा, नवस, समीर, नजीर, झाकीर हुसेन, शाजी पूवाथुंगल आणि शेरनास अश्रफ यांना अटक झाली होती. सर्व आरोपी हे पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) आणि त्याची राजकीय शाखा असणाऱ्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सदस्य आहेत. ही हत्या दुर्मीळातील दुर्मीळ प्रकरणाच्या श्रेणीत येते, असे निरीक्षण नोंदवत मावेलिक्कारा अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीदेवी व्ही.जी. यांनी १५ दोषींना फाशीची शिक्षा सुनावलं.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना स्मृतीदिनी विधानभवनात आदरांजली



मुंबई : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना स्मृतीदिनी विधान भवन येथे विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार व गुलाब पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी आमदार अभिमन्यू पवार विधिमंडळाचे सचिव (१) (कार्यभार) जितेंद्र भोळे, मुख्य सुरक्षा अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच याप्रसंगी हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांना दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

## दलित वस्तीमध्ये पाणीपुरवठा व पंधरा टक्के निधी न खर्च केल्यामुळे मूगळी येथे आंदोलन



अक्कलकोट/प्रतिनिधीः दलित वस्तीमध्ये पाणीपुरवठा व पंधरा टक्के निधी न खर्च केल्यामुळे मूगळी येथे दिनांक ३० जानेवारी रोजी दलित समाजाच्या वतीने खूप मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले. या आंदोलना वेळी सुनील गायकवाड परशुराम गायकवाड भोगेश सोबान कल्याणी कांबळे अनिल गण्यार विठ्ठल साबणे नागप्पा सोबान रोहित सोबान शांतलींग कांबळे गणेश कांबळे राजू कांबळे पंडित चंद्रकांत सोबान गायकवाड सुखदेव जीलानी पटेल समीर शेख गायकवाड योगेश सोबान वसीम नदाफ इस्माईल इनामदार विजय गायकवाड खाजाप्पा सोबान प्रज्योत साबणे प्रधानी सोबान, तसेच महिला कस्तुरीबाई सोबान सुनिता सोबान इंद्राबाई साबणे भाग्यश्री सोबान कल्पना सोबान प्रियंका गायकवाड रेणुका सोबान रेणुका शिंगे निजावा शिंगे अंबिका कांबळे सुगलाबाई कांबळे शिवनंदा गण्यार चन्नावा कांबळे रत्नाबाई कांबळे मलाबाई कांबळे कळाबाई कांबळे आणि समाज बांधव खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

### न्यायावर विश्वास...

जगण्याचा हक्क परत मिळविण्यासाठी बिल्किस बानोला तब्बल २४ वर्षे वाट पाहावी लागली. २००२ सालच्या गुजरातमधील दंगलीत गर्भवती बिल्किस बानोवर झालेल्या अत्याचाराने देश हादरला होता. २१ जानेवारी २००८ रोजी मुंबईतील विशेष न्यायालयात चाललेल्या खटल्यात यातील ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे बिल्किस बानोला न्याय मिळाला अशीच एकंदरीत भावना होती, पण गुजरात सरकारने १५ ऑगस्ट २०२२ रोजी ११ आरोपींची उरलेली शिक्षा रद्द करून त्यांना मुक्त केले होते. तेव्हा भीतीविना जगण्याचा हक्क परत मिळविण्याचे आर्जव करत बिल्किस बानोने सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. सुप्रीम कोर्टाने गुजरात सरकारचा निर्णय रद्द करत ११ आरोपींना पुन्हा तुरुंगात पाठवण्याचे आदेश दिले. देशात कायद्याचे राज्य असल्याचे सुप्रीम कोर्टाच्या निकालाने दाखवून दिले आहे. २००२ मध्ये गुजरातमध्ये जातीय दंगल उसळली होती. त्यावेळी बिल्किस बानो गर्भवती होती, पण या धार्मिक दंग्याने बिल्किस बानोसह तिच्या परिवाराला उद्ध्वस्त केले. दंग्याशी काहीही देणेघेणे नसलेल्या, पण विशिष्ट समाजाची असल्याने बिल्किस बानो अत्याचाराची बळी ठरली होती. गोध्रानंतरच्या हिंसाचारात गर्भवती बिल्किसवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. नराधम एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी बिल्किस बानोच्या कुटुंबातील तब्बल ७ जणांची हत्या केली होती. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या अत्याचारानंतरही बिल्किस बानो जिवंत राहिली होती. ती नुसतीच जिवंत राहिली नाही, तर तिने आपल्यावर झालेल्या अत्याचारासाठी कायदेशीर लढाई सुरू केली. मात्र, न्यायासाठी तिला तब्बल २४ वर्षे वाट पाहावी लागली. या घटनेचा खटला मुंबईतील विशेष कोर्टात चालला. कोर्टाने २१ जानेवारी २००८ साली ११ जणांना दोषी ठरवत त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. शासन यंत्रणेशी साटेलोटे आणि राजकीय वरदहस्त असल्याने आपली सहज सुटका होऊ शकते, असा गुन्हेगारांचा समज असतो. पण देशात आजही निर्भीड पोलीस अधिकारी गुन्हेगारांना शिक्षेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. बिल्किस प्रकरणाने हे दाखवून दिले आहे. महिला उच्चस्तरीय असो की निम्नस्तरीय, तिचा सन्मान केलाच पाहिजे, असे निरीक्षणही सुप्रीम कोर्टाने नोंदवले आहे. देशात सध्या असलेल्या वातावरणात हा आशेचा किरण आहे. म्हणूनच आता मी पुन्हा श्वास घेऊ शकते, असा विश्वास बिल्किस बानोला वाटू लागला आहे. हा खरे तर भारतीय न्यायव्यवस्थेचा विजय आहे.

## अडाण्यांनी वाचला मुकनायक

मुकनायक वृत्तपत्र सुरू करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एक अनोखी क्रांती करून प्रस्थापितांना धक्का च दिला. भारतामध्ये अनेक परकीय आक्रमण झाले, देशावर सत्तेसाठी राज्य केले, कोणी व्यापार करून आर्थिक लुट केली. हे देशासाठी घातक होतेच पण त्यापेक्षा ही घातक होते ते म्हणजे देशातच विषमता मजबूत करून माणसाला माणसापासून दुर ठेवणे, माणसाला शिक्षण, जागृती ज्ञानापासून व विकासापासून दुरच ठेवणे नव्हे तर शिक्षण, ज्ञानार्जन करून जागृत होणाऱ्या माणसाला हिन लेखने, त्याला शिक्षणाचा, ज्ञानार्जनाचा अधिकाराच नाही असे विकृत विचार पेरून स्वतः चे पोठ भरण्याचे काम हजारो वर्षांपासून येथे सुरू होते. जनावरांच्या पाठीवर थाप आणि माणसाला माणसाचा स्पर्श म्हणजे पाप एवढे विकृत विचार पेरून स्वतः चे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व लोकांना मानसिक गुलाम बनवण्याची विकृती फक्त भारतातच होती. मनुस्मृती ला कायदा समजून जगातील सर्वात विकृत सामाजिक स्थिती निर्माण करण्याचे काम याच लोकांनी केले होते. स्वतः चे वर्चस्व स्वतः च्या गुणांवर, स्वतः च्या कतृत्वावर निर्माण करू न शकणाऱ्या लोकांनी लोकांना अज्ञानी ठेवून अंधविश्र्वासात ठेऊन एवढे बंधने लादुन दिली की आणि बंधनाचे पालन करणे यालाच धर्म संबोधले गेले. शुद्रांनी ब्राम्हणासह तिन्ही वर्णाची सेवा करणे हा धर्म आहे पण शिक्षण घेणे, ब्राम्हणासमोर उभे राहणे, वेद वाचणे याला पाप मानले जायचे. विषमता मजबूत करण्यासाठी जाती व्यवस्था निर्माण करून दिली आणि जातीच्या उतरंडी मध्ये कोणतीतरी जात आपल्या खाली आहे यायच समाधान मानण्याची मानसिकता विकसित झाली

. परंतु जातीची उतरंड रचताना एका जातीचा भार दुसऱ्या जातीवर पडून मानुस त्रस्त होत आहे. आणि माणसाला त्रस्त करणारे नेमके कोण याबद्दल एकही चुकीचा शब्द बोलणे म्हणजे सर्वात मोठा गुन्हा ठरत असे. मुळात लोकांना अज्ञानात, अंधविश्र्वासात ठेवून त्यांच्या कमकुवत बाजुचा फायदा घेऊन आपले वर्चस्व निर्माण करणारे किती कमकुवत व निच माणसिकतेचे असतील याची प्रचिती येते. मनुस्मृती निर्मीत सर्व निच आणि माणसाला माणसा पासून दुर करणारे विचार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी झुगारून मानवतावाद व समतावाद प्रस्थापित केला. देशात परकीय सत्तेपेक्षा घातक अंतर्गत विचार व आचार आहेत आणि अंतर्गत विचार व आचार जो पर्यंत आपण बदलणार नाही तो पर्यंत माणसासह देशाची प्रगती होणे शक्यच नाही, हे ओळखून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अंतर्गत गुलामी पासून स्वातंत्र्य मिळवण्याचा लढा उभा केला. कोणताही लढा यशस्वी करायचा असेल तर त्याला वृत्तपत्राची जोड असते म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मुकनायक वृत्तपत्र सुरू करून या वृत्तपत्रातून विषमता, भेदभाव, अंधविश्र्वास या विरोधात लेखन करून समाजाला जागृत करण्याचे काम केले. हजारो वर्षांपासून ज्यांना शिक्षण, समता, हक्क अधिकार याचा गंधही नव्हता अशा परिस्थिती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्र सुरू करणे म्हणजे खुप धाडसाचे काम होते. एक तर ज्या लोकांना जागृत करायचे त्या लोकांकडे शिक्षण नाही, त्यांना लिहता वाचता येत नाही, काही लोकांना लिहता वाचता आले तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीकारी व परिवर्तनवादी विचार एकदम पटतील की नाही याची खात्री नव्हती, कारण हजारो वर्षांपासून मानसिक गुलामीच्या माध्यमातून विषमता व अस्पृश्यता ही खुप बळकावली होती. बरेच लोक स्वतः च स्वाभिमानी जिवन जगण्याचे धाडस करत नव्हते. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तमानपत्र सुरू केले. वाचक, वर्गणीदार, जाहिरात वर्ग मिळेल की नाही याची कोणतीही पर्वा न करता आपले काम सुरू केले. बहुतांश अडाणी अशिक्षित लोक असुनही मुकनायक ने समाजात निर्भीडपणे जागृती करून विचार पेरण्याचे काम केले. एकशे चार वर्षा अगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी शिक्षणाने कमी, संख्येने कमी आणि आर्थिक दृष्टीने कमकुवत असुनही डॉ बाबासाहेब आंबेडकर चार वर्तमानपत्र सुरू करून विचार पेरण्याचे काम करतात. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्या नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे शिक्षण, नोकरी, सन्मान, स्वाभीमान व समता मिळाली, पुर्वीची परिस्थिती कल्पनेपेक्षा जास्त बदलली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संघटन उभे राहीले, हजारो नेते झाले परंतु यामध्ये कुठे च आंबेडकरवादी विचार व आचार अपवाद वगळता दिसून आले नाही. कारण जेथे भारताचे उद्धारक म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष केला जातो तो फक्त जयजयकार करण्यासाठीच आहे. आचरना साठी नाही. अनेक लोक स्वतः ला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नेते समजून घेतात, देशभर, राज्यभर कार्यकर्ते आहेत म्हणतात परंतु देशभर, राज्य भर प्रत्येक अनुयायाच्या घरात जाईल असे वर्तमानपत्र एकही नेता सुरू करू शकला नाही. बर नेत्यांनी नाही सुरू केले तरी चालेल परंतु हजारो नेते असुनही ज्यांनी स्वतः च्या खर्चातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित वर्तमानपत्र सुरू केले त्या वर्तमानपत्राला हातभार ही लावला नाही. प्रत्येक घरात वाचक असुनही प्रत्येक घरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे वर्तमानपत्र जात नाही. मग प्रश्र्न उभा राहतो की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जे विधान केले होते की कोणतीही चळवळ अथवा लढा यशस्वी करायचा असेल तर वर्तमानपत्राची गरज असते. येथे हजारो लोक चळवळीच्या नावाखाली स्वतः चे पोट भरत आहेत पण वर्तमानपत्रावर मात्र कोणी बोलत नाही, कोणताही नेता कोणत्याही आंबेडकरवादी विचारसरणीचे वृत्तपत्र घरात असावे, आपल्या कार्यकर्त्यांनी वाचावे असा आग्रह ही करत नाहीत. मग यांची चळवळ आहे तरी कोणती? अजून एक गंभीर स्वरुपाचा प्रश्र्न उपस्थित राहतो तो म्हणजे जे लोक स्वतः ला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेतात त्या लोकांच्या घरी तरी आंबेडकरवादी विचारसरणीचे वर्तमानपत्र नियमित जाते का? दरवर्षी नाचगाण्यावर आणि मनोरंजनावर लाखों रुपये खर्च होत असतील आणि तेथे वर्तमानपत्र नसेल तर आपण कोणतीही चळवळ करत नसुन अधोगतीकडे जात आहोत याचे हे लक्षण नाही का? आज प्रत्येक घरात वर्तमानपत्र जाईल एवढी आर्थिक कुवत व प्रत्येक घरात वर्तमानपत्र वाचले जाईल एवढे शिक्षीत लोक असूनही आपण राज्य, देश पातळीवर स्वतः चे एक मोठे वर्तमानपत्र का निर्माण करू शकलो नाही? जे पोटतिडकीने काम करतात त्या वर्तमानपत्रांना जगवण्याची व घराघरात पोहचवण्याची जबाबदारी आपण का घेत नाही? विचार केला तर किती विदारक परिस्थिती आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे वर्तमानपत्राला चळवळीमधील एक अविभाज्य भाग समजायचे. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तमानपत्र वगळून कधीच चळवळ केली नाही. आणि आज चळवळीच्या नावाखाली वळवळ करणाऱ्यांची संख्या वाढली कारण वर्तमानपत्र नाही. आजही देशात सामाजिक व राजकीय समस्या अनेक आहेत त्या समस्या कशा सोडवायच्या आणि समस्यांचे गांभीर्य घराघरात पोहचवण्याचे काम वर्तमानपत्र करत असते. परंतु वर्तमानपत्र च नसल्याने ज्यांचे आहेत ते लोक दाखवतील तेच आम्हाला महत्त्वाचे वाटणार यात काही शंकाच नाही. संविधान व संविधानीक हक्क धोक्यात आहेत, बुद्ध मुर्त्याचे दैविकरण करून देव बनवले जात आहे, लेण्यावर बुद्ध मुर्तीचे दैविकरण सुरू आहे, कोरेगाव भिमाचा जयस्तंभाचा वाद न्यायालयात आहे. परंतु याबाबत कोणालाच गांभीर्य नाही. शिक्षण, आरक्षण, रोजगार फक्त कागदोपत्रीच आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान विरोधी लोकांचे वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणारे काही स्वयंघोषित विद्वान म्हणातात हे पेपरवाले खऱ्या, निष्पक्ष व संविधान आणि हक्क अधिकार जागृती च्या बातम्या छापत नाहीत. परंतु हेच विद्वान आंबेडकरवादी विचाराचा पेपर स्वतः विकत घेणार नाहीत किंवा इतरांना ही घेण्याचे सांगत नाहीत. काही काही लोक तर डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधाना मुळे स्थायीक झाले आणि त्यांनी वाचन व विचारच सोडून दिले. आज वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक माध्यमासासाठी अनुकुल परिस्थिती असतानाही वाचक वाचत नाहीत, आणि पैसे असूनही वर्तमानपत्र चालवायला मदत करत नाहीत. म्हणून डोक्यात सहज येते लोक अडाणी आणि गरिब होते तरीही मूकनायक निर्माण होतो. आज लोक शिक्षीत व श्रीमंत असतानाही वर्तमानपत्राचा प्रचार आणि प्रसार होत नाही ही खंत एकशे चार वर्षांनंतर असेल तर या पेक्षा अडाणी व गरीब लोक चांगले त्यांनी मुकनायक वाचला.

**विनोद पंजाबराव सदावर्ते मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ..

अवघ्या चित्रपटसृष्टीत परिचित आहेत. मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाने त्यांचे वेगळे अस्तित्व निर्माण केले. व्यावसायिक नाटकापासून त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर पांडू हवालदार, राम राम गंगाराम, अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्र्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा, एक उनाड दिवस, शुभमंगल सावधान, आई नंबर वन अशा चित्रपटांतून विविधरंगी भूमिका करुन प्रेक्षकांच्या मनात स्वत:चे स्थान निर्माण केले. स्वत:च्या कामाचे क्षेत्र मर्यादित न ठेवता त्यांनी विनोदी, खलनायक तसेच गंभीर पात्रेही पडद्यावर साकार केली आणि त्यातून वेगळी शैली निर्माण केली. त्यांच्या या कारकिर्दीचा गौरव राज्य शासनाने या पुरस्कारासाठी त्यांची निवड करुन केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, डॉ. अनिल काकोडकर, वासुदेव कामत, डॉ. गो. ब. देगलूरकर, डॉ. शशिकला वंजारी, ॲड. उज्वल निकम आणि समितीचे सदस्य सचिव बिभीषण चवरे यांचा समावेश होता.

राज्य शासनाने प्रख्यात लेखक पु. ल. देशपांडे यांना पहिला महाराष्ट्र भूषण पुरस्कार देवून त्यांच्या साहित्य सेवेतील योगदानाबद्दल गौरविले होते. त्यानंतर गानसम्राज्ञी लता मंगेशकर (संगीत), ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावसकर (क्रीडा), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर (विज्ञान), क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर (क्रीडा), पंडीत भीमसेन जोशी (कला/संगीत), सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग व राणी बंग (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर (विज्ञान), उद्योगपती रतन टाटा (उद्योग), रा. कृ. पाटील (समाजरप्रबोधन), कवीवर्य मंगेश पाडगावकर (साहित्य), नानासाहेब धर्माधिकारी (समाजप्रबोधन), ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर (मराठी चित्रपट), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर (विज्ञान), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर (विज्ञान), शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (साहित्य), ज्येष्ठ गायिका आशा भोसले (संगीत) आणि निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी (समाजप्रबोधन) यांना राज्य शासनाने यापूर्वी महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे.

### मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा

ज्यांची कुणबी नोंद मिळाली त्यांना प्रमाणपत्र वाटप होणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण १० फेब्रुवारीचा निर्णय घेतलेला आहे, अशी घोषणा मी रायगडाच्या पायथ्याशी करत आहे, असंही जरांगे पाटील म्हणाले.

चार दिवस उलटून गेले तरी आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवांवरील गुन्हे मागे घेतलेले नाहीत. तुम्ही तत्काळ शब्द वापरला आहे. सरकारकडून वेगवेगळे स्टेटमेंट येत आहेत. त्यामुळे सरकारची भूमिका आम्हाला कळत नाही. त्यामुळे १० फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावे, असा इशाराही जरांगे पाटलांनी दिला.

हैदराबादचे १८८४ चं गॅझेट चार दिवस उलटूनही स्वीकारलं नाही. रायगड चढतानाही मी याची माहिती घेत होतो. परंतु, अद्यापही हे गॅझेट स्वीकारण्यात आलेलं नाही. हे गॅझेट स्वीकारून त्याला शासकीय नोंदीचा दर्जा दिला पाहिजे. बॉम्बे गव्हर्मेंटचं गॅझेट स्वीकारलं नाही. १८८४ ची जनगणनाही स्वीकारावी. कारण शिंदे समितीकडे ते देणं आवश्यक आहे. १९०२ चा दस्तावेज घेतलेला नाही. ओबीसी आयोगाचा अहवाल जाणं महत्त्वाचा आहे.सगेसोयरेबाबत राजपत्रित अधिसूचना दिली आहे. ही अधिसूचना टिकवण्याची जबाबदारी सरकारची आहे. कारण, सरकार आम्हाला सांगतं की ते टिकवलं जाणार आहे, असंही ते म्हणाले.

### १४६ विरोधी खासदारांचे

यामध्ये लोकसभेतील १०० आणि राज्यसभेतील ४६ खासदारांचा समावेश होता. निलंबित खासदारांपैकी १३२ खासदारांना हिवाळी अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले असून अधिवेशन संपताच त्यांचे निलंबन संपुष्टात आले. १४ खासदारांचे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवण्यात आले होते.

# कराड विमानतळाचे विस्तारीकरण व नाईट लँडींगची कामे वर्षभरात पूर्ण करण्यास प्राधान्य : पालकमंत्री शंभुराज देसाई

सातारा : एका वर्षात कराड विमानतळाचे विस्तारीकरण आणि रात्रीच्या वेळी विमान सेवा सुरू करणे. या बाबीला प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यातील पर्यटन, उद्योगवाढीला चालना मिळणार आहे, असे कराड विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबतच्या आढावा बैठकीत पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधिक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, उपवनसरंक्षक आदिती भारद्वाज, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, विमानतळ प्राधिकरणाचे विभागीय व्यवस्थापक संतोष नलावडे, उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता जयंत शिंदे आदी उपस्थित होते.

कराड विमानतळ विस्तारीकरण व नाईट लॅडींग हा विषय अनेक वर्षापासूनचा प्रलंबित आहे. २०१२-१३ मध्ये विस्तारीकरणाचा आराखडा तयार करण्यात आला आहे सध्याची असणारी १ हजार २८० मीटरची धावपट्टी वाढवून ती १ हजार ७०० मीटर करण्यात येणार आहे.विस्तारीकरणासाठी ४८ हेक्टरचे भूसंपादन झाले आहे. जवळपास ६२ टक्के खातेदारांना भूसंपादनापोटी मिळणारा निधी शासनाने वितरीत केला आहे. उर्वरित खातेदारांना पंधरा दिवसांची नोटीस देऊन भूसंपादनाची भरपाई स्वीकारण्याचे आवाहनही पालकमंत्री श्री. देसाई यांनी केले.

भरपाईची रक्कम न स्वीकारल्यास रकमेचा भरणा कोर्टात करण्यात येऊन जमीन ताब्यात घेण्यात येईल व संपादित जमिनीस लवकरात लवकर शासनाचे नाव लावण्याच्या कामास प्राधान्य देण्याचा निर्णय पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत झाला.

यावेळी एअरपोर्ट थोरिटी ऑफ इंडिया यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार जी बांधकामे, टॉवर्स अडथळा निर्माण करणारी ठरतील ती अतिक्रमणे काढण्याबाबत कारवाई करण्याचे निर्देशही या बैठकीत पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.

पवनचक्क्यांचे जिओ टॅगिंग करा

पाटण तालुक्यात १ हजार ६२ पवनचक्क्यांची नोंद असून उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक पवनचक्कीची नोंद कटाक्षाने झालीच पाहिजे याबाबत यंत्रणांनी दक्षता घ्यावी. ग्रामपंचायतीने पवनचक्क्यांचे क्रमांक देऊन त्याचे जिओ टॅगिंग करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.पाटण तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये पवनचक्क्या उभ्या आहेत त्या संबंधित कंपन्यांकडून ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या कराबाबतची आढावा बैठक पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधिक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, पाटणचे प्रांत सुनील गाडे, महाउर्जाचे महाव्यवस्थापक श्री. शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत अर्चना वाघमोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.ग्रामपंचायत हद्दीत



उभारण्यात येणाऱ्या पवनचक्कयांना क्रमांक देण्यात यावेत असे सांगून, पवनचक्की कंपन्यांनी शासनाचा कर चुकवेगिरी करु नये यासाठी उभारण्यात आलेल्या पवनचक्क्यांमधून किती विद्युत निर्मिती होते याची तपासणी करण्यात यावी, अशा सूचना देऊन पालकमंत्री श्री. देसाई यांनी कर थकबाकी असणाऱ्या कंपन्यांना अंतिम नोटीस देऊन विहित मुदतीत भरणा न झाल्यास कारवाई करावी व थकबाकीदारांकडून व्याजासह वसुली करण्यात यावी, असेही निर्देश दिले.

**मोरणा गुरेघर व वांग मराठवाडी प्रकल्पांचा आढावा स**तारा दि.३० : पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी मोरणा गुरेघर व वांग मराठवाडी प्रकल्पांचा जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात आढावा घेतला.

या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, पोलीस अधीक्षक समिर शेख, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता जयंत शिंदे आदी उपस्थित होते.

मोरणा गुरेघर प्रकल्पांतर्गत उजवा व डावा कालवा हा बंदिस्त पाईपलाईन करावयाचा आहे. या कामाच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत बैठक घेऊन विशेष बाब म्हणून या कामाला मंजुरी घेण्यात येईल. त्याचबरोबर वांग मराठवाडी प्रकल्पातील पाटण तालुक्यातील जिंती व निगडे गावातील २६१ कुटुंबांचे पुनर्वसनाचा प्रश्र्न प्रलंबित आहे. याबाबतही पुनर्वसन मंत्री यांच्याशी बैठकीचे आयोजन करुन या पुनर्वसनासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी घेण्यात येईल.वांग मराठवाडी प्रकल्पील पाटण तालुक्यातील जिंती व निगडे प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी जलसंपदा विभागाकडे निधी उपलब्ध आहे. हा निधी पुनर्वसनासाठी देण्याबाबत पुनर्वसन विभागाची मंजुरीही घेण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी बैठकीत सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# भिवंडीत कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न



भिवंडी/मिलिंद जाधवः भारतीय बौध्द महासभा भिवंडी तालुका आयोजित महिला व पुरुष कार्यकारिणी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर भिवंडी तालुक्यातील कांबे येथे संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून भिवंडी शहराध्यक्ष केंद्रीय शिक्षक रमेश गांधले आणि केंद्रिय शिक्षिका सुनिताताई बचुटे हे उपस्थित होते. सदर शिबिराच्या अध्यक्षस्थानी रंजनाताई भोईर आणि रोहित जाधव होते.

तसेच शिबिरार्थी म्हणून महिला विभागच्या सरचिटणीस श्वेता भालेराव, कोषाध्यक्षा वैशाली भोईर, संस्कार उपाध्यक्षा चेतना गायकवाड, प्रचार पर्यटन उपाध्यक्षा बारकुबाई गायकवाड, संरक्षण उपाध्यक्षा अर्चना मोहिते, संस्कार सचिव समिक्षा गायकवाड, प्रचार पर्यटन सचिव रेणुका पवार, संरक्षण सचिव प्राची लोकरे, निता भोईर कार्यालयीन सचिव काळूबाई चन्ने, रिना जाधव, संघटक रजनी गायकवाड, सुनंदा जाधव पुरुष विभागाचे सरचिटणीस संदीप जाधव, कोषाध्यक्ष संजय गायकवाड, संस्कार उपाध्यक्ष योगेश मोहिते, प्रचार पर्यटन उपाध्यक्ष अजय गायकवाड, संस्कार सचिव कैलास चव्हाण आणि धार्मिक गायकवाड, प्रचार पर्यटन सचिव किशोर गायकवाड आणि मंगेश गायकवाड, संरक्षण सचिव रमण जाधव आणि सुधीर जाधव, समीर जाधव उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे जिल्हा संघटक अशोक जाधव आणि संघटीका सुशिलाताई गायकवाड उपस्थित होते.तसेच विनायक जाधव, डी. एस. गायकवाड, प्रमोद गायकवाड, संजय जाधव, रविंद्र कांबळे, आकाश गायकवाड बापू माने, प्रीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन योगेश मोहिते यांनी केले.

# मोफत त्वचारोग निदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद



पंढरपूर/प्रतिनिधी : फडे नर्सिंग होम पंढरपूर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त त्वचारोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात जवळजवळ ३७० हून अधिक रुग्णांनी याचा लाभ घेतला.या शिबिराचे उद्घाटन चंदुकाका सराफ ज्वेल्स चे अतुल जिनदत्त शहा,सौ संगीता अतुल शहा,डॉ विजय फडे,विक्रम नाईकनवरे,कमल फडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलाने झाली. सध्या प्रदूषणामुळे त्वचा संबंधित आजारांचे प्रमाण वाढते आहे त्यामुळे या आजारा विषयी जनजागृती होणे आवश्यक असल्याचे मत पुणे येथील त्वचारोग तज्ञ डॉ.अंकिता शहा फडे यांनी सांगितले. या शिबिराला पंढरपूर मंगळवेढा विधानसभा आमदार समाधान आवताडे, धाराशिव साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर अमरजित पाटील,युवा नेते प्रणव परिचारक, माजी नगराध्यक्ष दगडूआण्णा धोत्रे, डॉ अरूण मेणकुदळे,विनोद लटके, दत्तात्रय धोत्रे,अक्षय वाडकर यांच्यासह विविध मान्यवरांनी शिबीराला सदिच्छा भेट दिली.या शिबिरात पांढरे डाग,केस गळती,कोंडा, मुरम/पिंपल्स,सुरकुत्या या आजारांवर उपचार व मार्गदर्शन करण्यात आले.हे शिबीर यशस्वी होण्यासाठी सिध्दार्थ शहा पुणे, डॉ.राजेश फडे,डॉ.सपना फडे यांनी प्रयत्न केले.

# अभिनव बाल विकास मंदिर नांदुर्डी नवरंग सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

निफाड : निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जनता विद्यालय व अभिनव बालविकास मंदिर नांदुर्डी शाळेत नवरंग सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून म वि प्र संचालिका श्रीमती शोभाताई बोरस्ते व भागवतबाबा बोरस्ते हे उपस्थित होते तसेच माध्यमिक मुख्याध्यापक डावरे डी ए अभिनव स्कूल कमिटी अध्यक्ष सीताराम पा ढोमसे माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष बोराडे तात्या उच्च माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ पा निकम व सर्व सदस्य उपस्थित होते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्र मुख्याध्यापक शिंदे व्ही यु यांनी केले तसेच डावरे डी ए सर भागवतबाबा बोरस्ते यांनी आपले मनोगत मांडले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ए एम गुरगुडे व कदम एस डी यांनी केले कार्यक्रमात लहान गट मोठा गट व ई १ ली ते ४ थी च्या सर्वच मुलांनी आपला सहभाग नोंदविला यात देशभक्तीपर गीत कोळी गीत पंजाबी गीत जोकर थीम मराठी गाणे मराठी नाटक कॉमेडी शो रामसीता आदिवासी गाणे तांडव मोबाईल थीम गोंधळ अशा विविध गाण्यानी उपस्थित्यांची मने जिंकली सदर कार्यक्रमासाठी गावातील व पंचक्रोशीतील सर्व सन्मानीय पालकवर्ग उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी सहकार्य केले यात श्रीमती जाधव आर एस श्रीमती साबळे ठोंबरे ए एस तुरकने व्ही एस घोडेकर एस आर निचीत जे आर पाटील एम एस तसेच निकम डी एस श्री आहेर एस बी कुशारे एस एम तसेच सर्व सेविका उपस्थित होते



# कोरेगाव भीमाचा ऐतिहासिक जयस्तंभ ही राष्ट्रीय संपत्ती असून कुणाच्याही बापाची खाजगी मालमत्ता नाही : दादा भाऊ अभंग

चेंबूर : कोरेगाव भीमा येथील शौर्याचे प्रतीक असलेला ऐतिहासिक जयस्तंभ ही राष्ट्रीय संपत्ती असून ती आंबेडकरी चळवळीची अस्मिता आहे. ती कुणाच्याही बापाची खाजगी मालमत्ता नाही. काही घुसखोर ही आमची खाजगी मालमत्ता आहे असे सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहे आहे हा संभ्रम दूर करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती अभियान राबविणे आवश्यक असून घुसखोरांचां पर्दाफाश केला पाहिजे.

कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ हा शौर्याचे प्रतीक असलेला ऐतिहासिक जयस्तंभ असून तिथे माळवदकर कुटुंबाने अतिक्रमण केले असून त्या विरोधात न्यायालयांमध्ये लढा सुरू आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने मी त्यावर अधिक भाष्य करीत नाही. आपण संविधानिक न्यायालयावर विश्र्वास ठेवूया आपल्यालाच न्याय मिळेल असा विश्र्वास भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी चेंबूर येथील २७ जानेवारी रोजी झालेल्या जनजागृती अभियानात व्यक्त केला. चेंबूर येथील विपश्यना बुद्ध विहारांमध्ये चेंबूर मधील लढाऊ तरुणांनी भिमा कोरेगाव जयस्तंभ अतिक्रमण संविधानिक न्यायालयीन लढा जनजागृती अभियाना अंतर्गत अभियान राबविण्यात आले त्यात दादाभाऊ अभंग यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, पेशव्यांचा इतिहास, भीमा कोरेगावची लढाई व कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ आणि जयस्तंभ परिसरातील झालेले अतिक्रमण आणि न्यायलय लढा याची विस्तृत माहिती सांगून या लढ्यामध्ये आंबेडकरी जनतेने तन, मन व धनाने सामील होऊन संपूर्ण महाराष्ट्रात या संवेदनशील व अस्मितेच्या विषयाची जनजागृती करावी असे आवाहन उपस्थितांना केले. सर्व उपस्थितांनी दोन तास दादाभाऊ अभंग यांचे मनोगत अत्यंत शांतपणे ऐकल्याबद्दल दादाभाऊ अभंग यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रथम पंचशील व बुद्ध वंदना घेऊन बौद्धाचार्य भरत अमृता गायकवाड यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील विद्रोही कवी बबन सरवदे यांनी केले. या कार्यक्रमात आदिनाथ हिरवे, मंगेश आव्हाड, मानव शिदू ढोणे, सुहास सरवदे, मोहन कांबळे, संजयदादा शिंदे, सार्थक भुजबळ, भीमराव आनंदा आढाव यांनी तन मन धनाने साथ देणार असे सांगून प्रत्यक्ष या लढ्यात कृतीने साथ दिली. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आंबेडकरी चळवळीतील लढाऊ तरुण नेत्या जयाताई बनसोडे, आंबेडकरी चळवळीतील युवा नेते बाळराजे शेळके, संजयदादा शिंदे, लहू कांबळे, मोहन सोनवणे, विलास काळे, राज वाघमारे, बौद्धाचार्य मंगेश आव्हाड होते.



कार्यक्रमाला महावीर कांबळे, अनिल बैले, सुनील खैरनार, राज त्रिभुवन, संतोष साळवे, सचिन भुजबळ, सिद्धार्थ सुर्यगंध, मानव ढोणे, सुहास सरोदे, भीमराव आढाव, मोहन कांबळे,भीमराव सावंत, तानाजी कांबळे, निखिल गांगुर्डे, दीपक आढाव, दिनेश दिवेकर, नरेंद्र कांबळे, पांडुरंग बेले, आशिष कांबळे, अनुकूल इंगळे, अभिषेक इंगळे, वैभव गवारे, प्रतीक जाधव,आदित्य हाके, धम्मदीप कदम, रोहित कांबळे संदीप कांबळे, वैभव गवळी, पृथ्वीराज इंगळे, प्रथमेश वाघमारे, अविनाश बेले, योगेश शिंदे, राजेंद्र वाघमारे, सुमित दहिभाते, भीमराव कांबळे,निलेश भुजबळ, वेदांत कांबळे, देवेंद्र संजय शिंदे, सोनू बाजीराव लहाने, राम जगन्नाथ खरे, देवेंद्र गायकवाड, एडवोकेट अजय गायकवाड डॉक्टर सौरभ विलास गांगुर्डे आधी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी तृषभ आव्हाड,सुमेध गरुड,जयेंद्र गायकवाड,आकाश किरतकर,अक्षय देठे,संतोष साळवे, मयूर खांबे यांनी प्रचंड मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. जनजागृती अभियान आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला असलेल्या सिद्धार्थ कॉलनी येथून सुरू झाल्याने त्याचे लोण संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल असा विश्र्वास महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील प्रसिद्ध विद्रोही कवी बबन सरवदे यांनी व्यक्त करून हा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या सर्व तरुणांचे कौतुक करून आभार मानले व असेच जनजागृती अभियान संपूर्ण महाराष्ट्रात आंबेडकरी जनतेने राबवावे असे आवाहन केले.

# विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांनी जात प्रमाणपत्र पडताळणी साठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन





नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : धाराशिव जिल्ह्यातील शासकीय व निम शासकीय विद्यालय किंवा महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक संपूर्ण कागदपत्र घेऊन आपण आपल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती धाराशिव येथे आपला प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन धाराशिव जिल्ह्याचे जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त बलभीम शिंदे व जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव श्रीमती सुलोचनाताई सोनवणे यांनी केली आहेधाराशिव जिल्ह्यात फक्त विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कागदपत्रासह धाराशिव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जाती प्रमाण तर पडताळणी समितीकडे आपला प्रस्ताव सादर करावेत प्रस्ताव करताना आपल्या वंशावळ मधील सर्व नातेवाईका व त्यांच्या पुराव्यासह प्रस्ताव सादर करावेत .

जेणेकरून हा प्रस्ताव त्रुटीमध्ये राहू नये याची सर्रास काळजी विद्यार्थ्यांनी घ्यायची आहे . जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील सर्व कर्मचारी यानी तत्पर सेवा देणार असून सर्वांचे प्रस्ताव या ठिकाणी एक महिन्याच्या आत निकाली काढणार असल्याचे मत वृत्तपत्राशी बोलताना व्यक्त केली .विद्यार्थ्यांनी आपल्या प्रस्ताव तात्काळ जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीला दाखल सादर करावेत

या संदर्भात धाराशिव जिल्हातील सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीतील सर्वच सन्माननीय कर्मचारी यामध्ये भुषण माने , सुर्यकांत कठारे , विशाल रणदिवे , महेश कोळी ,राहुल कानवले , श्रद्धा निकंबे , उत्तम जाधव , ढगे यांनी आलेल्या पालकांना खूप चांगल्या पद्धतीने समज देऊन तो प्रस्ताव सादर करण्यासाठी सांगतात जेणेकरून कोणत्याही विद्यार्थीचे कसल्याही प्रकारचे हेळसांड होऊ नये यासाठी प्रमाणिक प्रयत्न करत आसतात आणी समज देतात अधिकाऱ्या सह कर्मचारी सुद्धा सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिसुन येतात यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करून सर्वांचं कौतुक केले जात आहे याचबरोबर नळदुर्ग येथील पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त बलभीम शिंदे आणि समितीच्या संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव सुलोचनाताई सोनवणे यांचा पुष्प बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सोबत चंदन गायकवाड आणि विद्यार्थी उपस्थित होते .

गेल्या वर्षी अनेक विद्यार्थांचे त्यांच्या निकषाप्रमाणे त्रुटी पूर्ण करून तात्काळ जात प्रमाणपत्र पडताळणी करून देण्यात आले आहे . कारण विद्यार्थांचे कोणत्याही विद्यार्थांचे नुकसान होऊ नये यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतात या सर्व गोष्ठी मुळे सर्वांचे कौतुक व अभिनंदन होत आहे .

तरी धाराशिव जिल्ह्यातील जास्तीत जास्त विदार्थांनी जाती प्रमाणपत्र पडताळणी साठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन उपायुक्त बलभिम शिंदे व संशोधन अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी केले आहे .

# मुन्नाभाई नंदागवळी इंडियन आयडॉल स्टार पुरस्काराने सन्मानित

## जिजाऊ साहित्य परिषदेचे पुरस्कार : सर्वांगीण कार्याची घेतली दखल

अर्जुनीमोरगाव : जवळच्या येरंडी गावातील तरुण तडफदार युवा व्याख्याते, आंबेडकरवादी साहित्यिक, विचारवंत व कवी प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांना २०२४ चा इंडियन आयडल स्टार पुरस्कार देऊन गौरवण्यात करण्यात आले.

यावेळी मंचावर पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूरचे संमेलनाध्यक्ष डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आमदार मनोहर चंद्रीकापूरे यांनी उद्घाटन करुन प्रमुख पाहुणे म्हणून लुणकरण चितलांजे, मुकेश जायस्वाल, डॉ ईश्र्वर मोहूर्ले, दानेश साखरे, शारदा राजकुमार बडोले, डॉ. कल्पना सांगोळे, अंजणाबाई खूणे, ताबा बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते. पहिले जिजाऊ साहित्य संमेलन हे शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनीमोरगाव येथे दि. २८ जानेवारीला दुपारी १२.०० वाजता पुरस्कार वितरण करण्यात आले. यामध्ये अनेक लोकांना पुरस्कार मिळाले. मुन्नाभाई नंदागवळी यांनी जवळपास सर्वच क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. उच्चविद्याविभूषित असून ते उत्तम व्याख्याते, चांगले अभ्यासक, विद्रोही कवी, स्वच्छंदी मार्गदर्शक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक क्षेत्रात नाव कमावल्याबद्दल सदर संस्थेने दखल घेऊन नंदागवळी यांना सन्मान चिन्ह, मानपत्र, शाल, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे डॉ सुकेशिनी बोरकर, खेमचंद रंगारी, सुधा मेश्राम, प्रगती शेंडे, विनोद गहाने, आई वडील व भाऊ यांनी अभिनंदन करून पूढील वाटचालीत शुभेच्छा दिल्या.



# एस जी परमशेट्टी प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दुधनी/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी प्रशालेत प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमानी साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रशालेचे मुख्याधापक रेवणसिध्द आलिगावे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कला, गीत गायन नृत्य सादर करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमात लक्ष्मी परमशेट्टी हिचे उत्कृष्ट भाषण, संचिता पवार,स्वाती राठोड, सानिया पठाण यांचे अप्रतिम नृत्य लक्ष्यवेधी ठरले.नेपाळ येथे गेलेल्या शैक्षणिक सहल यशस्वी केल्याबद्दल सहल प्रमुख दत्तात्रय हिळळी, राजशेखर पाटील यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी परमेश्र्वर कोळी. रामलिंग मंजुळकर सिद्धाराम नुला, महानिंग सोमेश्र्वर. मलया स्वामी. चंद्रशेखर खंडाळा, सुरेश बिराजदार खाजपा शिंगे. सातलिंग गुळेगोंडा.अविनाश भैरुणगी. गिरीश गाडी, धर्मा भोसले. मल्लिनाथ खैराटे नागदेवी स्वामी. प्रियांका पावली, लक्ष्मी म्हेत्रे. श्रुती दिवटे. महादेवी कोरे . पार्वती हिरेमठ यांच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचारी. माजी विद्यार्थी , पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख नागराज कलबुर्गी यांनी केले तर शेवटी आभार क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळळी यांनी मानले



# चुकीचे वागणाऱ्या पत्रकारांनी लोकशाहीचा पार चोथा करुन ठेवलाय : घनश्यान दरोडे

शिर्डी प्रतिनिधी : दैनिक समर्थ गांवकरी उत्कृष्ट पत्रकारीता पुरस्कार व स्नेहमेळावा शिर्डी येथील हॉटेल भक्ती येथे आयोजित केला होता.यावेळी दैनिक समर्थ गांवकरिचे अनेक पत्रकार यावेळी उपस्थित होते.

यावेळी समर्थ गांवकरीचे संपादक डॉ.विश्र्वासराव आरोटे,समुह संपादक सागर दोलतडे, कार्यकारी संपादक नवनाथ जाधव, निवासी संपादक प्रतिक गंगणे , नवीं मुंबई संपादक,दशरथ चव्हाण दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आदींसह राज्यातील पत्रकार बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते. प्रतिमापुजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली.यावेळी राज्यातील १५ पत्रकारांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणुन स्टार गांवकरी पुरस्कार २०२४ देवुन गौरविण्यात आले.या निमीत्ताने पत्रकार स्नेहमेळाव्याचे आयोजनही करण्यात आले होते.

यावेळी समर्थ गांवकरी च्या अंकाचे,गांवकरीच्या कॅलेंडरचे तसेच गांवकरीच्या डायरीचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन छोटा पुढारी घनश्याम दरोडे उपस्थित होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ गांवकरी वृत्तसमुहाचे मुख्य संपादक डॉ.विश्र्वासराव आरोटे हे होते.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित असलले छोटा पुढारी घनश्याम दरोडेंच्या भाषणाने कार्यक्रमामधे रंगत आली होती.यावेळी बोलताना दरोडे म्हणाले,बाबांनो जग विश्र्वासावर चालतंय,आपल्या सोबत नूसता विश्र्वासच नाही तर,डॉ.विश्र्वासराव आहेत.तर,त्यांच्या विश्र्वासाला तडा जावु देवु नका.आपण विश्र्वासासोबत रहा आपली प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही.आपल्या सर्वांना समर्थ गांवकरीमधे काम करण्याची संधी मिळाली याचं सोनं करा.प्रत्येक अडचणीवर मात म्हणजे विश्र्वासराव आरोटे.एवढेच काय अडचणीच येणार नाहीत असे काम आरोटे साहेबांचे आहे.सध्या सगळ्यात जास्त पुढार्याचा वेळ पत्रकार घेतात.इथं मात्र उलटं झालंय त्या पुढार्यांचा वेळ घेणार्या पत्रकारांचा सर्वात जास्त वेळ छोटा पुढारी घेतोय.समर्थ गांवकरीचा अंक,डायरी, कॅलेंडरचे प्रकाशन माझ्या हस्ते केले याबद्दल धन्यवाद.



पत्रकारीतेवर बोलताना छोटा पुढारी म्हणाला,सध्या पत्रकारीता करणं अवघड झालंय.हल्ली काही चुकीचे वागणारे व स्वत:ला हुशार पत्रकार समजणार्या व चुकीचे वागणार्या काही पत्रकारांनी लोकशाहीचा पार चोथा करुन ठेवलाय.आरे पत्रकारीतेवर देश चालतोय.त्यामुळे चुकीच्या बातम्या देवु नका.शहानिशा करुनच बातमीदारी करावी. भल्याभल्यांना सरळ करण्याची ताकद पत्रकारीतेमधे आहे.बातमीच्या मुळाशी जावुन सत्यता पडताळुनच बातमी करा.रामाला शेतु बांधण्यासाठी वानर सेनेने मदत केली होती.तशी डॉ.विश्र्वासराव या रामालालाही पत्रकारांचे रुपाने वानरसेनाच मिळाली आहे.आता समर्थ गांवकरीचा सेतु कसा बांधायचा हे तुम्ही पत्रकार बांधवांनीच ठरवायचे आहे.बातम्या सरळ देवुनही कुणी त्रास दिला तर त्याला कसं सरळ करायचं ते कायद्याच्या भाषेत आपण त्याला शिकवु.

कोरोना काळामधे सगळे घरात बसले होते मात्र, माझा पत्रकार बांधव देशाची काळजी करत होता.तो घराबाहेर पडून लोकांना धीर देत होता.मला कोरोना होईल मग माझे कुटुंबाचे कसे होईल याची काळजी पत्रकाराने कधीच केली नाही. त्याला देश वाचवायचा होता कारण तो लोकशाहिचा चौथा स्तंभ आहे.

पुरस्कारांवर बोलताना दरोडे म्हणाले,पुरस्कार मिळतात पण त्याचाही क्रायटेरीया ठरलाय.पहीले,

आतापर्यंत काहीच केले नाही,इथुन पुढे तरी काहीतरी करा म्हणुन पुरस्कार.दूसरे,आतापर्यंत काहीतरी केलंय ते लय झालंय म्हणुन पुरस्कार,तिसरे आता पर्यंत तुम्ही काय केलंय,येथुन पुढे यापेक्षा जास्त काहीतरी करा आणि तोच खरा पुरस्कार असतो असे दरोडे म्हणताच सर्वांना खळखळुन हसु आले.समर्थ गांवकरी व डॉ.आरोटे सरांच्या कार्याला माझा सलाम असे म्हणत दैनिकासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्ष स्थानावरुन बोलताना समर्थ गांवकरीचे संपादक व राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉ.विश्र्वासराव आरोटे म्हणाले,समर्थ गांवकरी हे दैनिक माझे नाही, या दैनिकाचा मी मालकही नाही.मी तर सेवक आहे.समर्थ गांवकरी या समुहामधे काम करणारा प्रत्येक पत्रकार या दैनिकाचा मालक आहे.या दैनिकामधे काम करणार्या प्रत्येकाला आपण विमा देणारच आहे परंतु,प्रतिनिधीच्या कुटुंबावर कुठलेही संकट आले तर त्याच्या पाठीशी पूर्ण ताकतीनिशी मी उभा राहील.वृत्तपत्र विक्रेता ते संपादक असा माझा प्रवास राहीला आहे.मला गर्दी नको दर्दी हवेत.पुरस्कार हि प्रेरणा आहे.त्यामधुन अजुन चांगले काम करण्याची उर्जा मिळते.हाच मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवत मला अशी सेवा करण्याची सधी मिळो हिच ईश्र्वराकडे प्रार्थना.लोकं मित्राला संपवायचे असले की त्याला एक स्कार्पीओ घेवुन द्या आणि एखादं वर्तमानपत्र काढायला लावतात.मग त्याला भिक मागण्याशिवाय पर्याय उरत नाही.मात्र आपले तसे नाही मला संघर्ष आणि चळवळीचा वारसा आहे.वेळ आल्यावर अनेक संपादक तो आमचा प्रतिनिधी नाही म्हणुन सांगतात.मात्र मी पत्रकाराचे पाठीशी खबिरपणे उभा राहतो.मग तो पत्रकार कुठल्या वर्तमान पत्राचा, कुठल्या संघटनेचा असो,याचा विचार मी कधीच करत नाही.त्याच्यावर वेळ आल्यावर आपण सर्वात अगोदर त्याला मदत करतो.ब्लॅकमेलींग करणार्याचे मी कदापीही समर्थन करणार नाही.पण चांगली बातमीदारी करा मी सदैव त्या पत्रकाराच्या पाठीशी उभा राहील असे आरोटे म्हणाले.

यावेळी बोलताना पत्रकार दत्ता गाडगे म्हणाले,पत्रकारीता आपले अस्त्र असुन,त्याचा उपयोग योग्य वेळी, योग्य ठिकाणी केला तर पत्रकाराची प्रगती होईल.त्यासाठी प्रामाणिकपणा सचोटीने काम करायला हवे. डॉ.विश्र्वासराव आरोटे यांनी दिलेल्या व्यासपीठामुळे आज अनेकजन मोठ्या विश्र्वासाने,आज पुढे जात आहेत.समर्थ गांवकरी समर्थपणे राज्यभर नेत आहेत याचे कौतुक वाटते असे सांगीतले.प्रत्येक पत्रकाराच्या सुख दु:खात सहभागी होत त्याच्या प्रत्येक अडचणीमधे साथ करणारा डॉ.विश्र्वासराव आरोटे हे राज्यातील पहीलेच संपादक असतील.

भगवान चंदे म्हणाले,आपण पुढे जात असताना,इतरांनाही कसे पुढे न्यायचे याचं उत्तम उदाहरण म्हणजे विश्र्वासराव आरोटे.

यावेळी छोटा पुढारी घनश्याम दरोडे व समर्थ गांवकरीचे संपादक डॉ.विश्र्वासराव आरोटे यांचा सर्व पत्रकारांचे वतीने सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनिता मॅडम यांनी केले तर, सुत्रसंचालन ज्योती करपे यांनी तर प्रास्ताविक व आभार भाऊसाहेब वाघचौरे यांनी मानले.

# जेऊरवाडी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक वाय एन पवार निलंबित

## शासकिय कर्तव्यात कसुर केल्याने गटविकास अधिकाऱ्यांची कारवाई

**ग्रामसेवकांच्या चुकीच्या कामाबाबत तक्रारी दाखल झाल्यावर त्या ग्रामसेवकावर करवाई केले जातील. असे प्रशासकीय अधिकाऱ्याकडून सांगितले जात आहे.**



ग्रामसेवक वायएन पवार हे २६ जानेवारी च्या ग्रामसभेला उपस्थित राहून लोकांचे प्रश्र्न सोडवण्याऐवजी ते गैरहजर होते.पाण्याचा प्रश्र्न गंभीर आहे.उपाययोजना आवश्यक असताना याविषयाकडे टाळाटाळ केलेला आहे.सतत गैरहजर,शासकिय कर्तव्यात कसुर व सदस्यांच्या तक्रारीवरून त्यांना निलंबन केले आहे.

**–सचिन खुडे ,गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट**

अक्कलकोट/यश सिध्दी न्युज नेटवर्क : जेऊरवाडी (ता.अक्कलकोट) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक वाय एन पवार यांना सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.ग्रामसेवक मासिक व पाक्षिक सभांना सतत विनापरवाना गैरजर,२६ जानेवारी रोजी ध्वजारोहण राष्ट्रीय कार्यक्रमाला अनुपस्थितीत,ग्रामपंचायतचे पारदर्शक कामकाज न करणे, ग्रामसभा न घेणे, नागरिकांच्या तक्रारीवरुन अक्कलकोट पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सचिन खुडे यांनी ग्रामसेवक यांना निलंबित केले आहे.

प्रशासकीय सूत्रांच्या माहितीनुसार ग्रामसेवक वाय एन पवार यांच्याकडे जेऊरवाडी ग्रामपंचायतीचे कारभार असून त्यांनी गेल्या दोन महिन्यापूर्वीच जेऊरवाडी गावचा कारभार स्वीकारले.त्या दिवसापासून नियुक्त ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वेळेवर न येणे, लोकांना दाखल्यापासून वंचित ठेवणे, गावाला विकासापासून दूर ठेवल्याचे व शासकीय कामात दिरंगाई, ग्रामसेवक त्यांच्याविरुध्द कार्यालयीन कामकाजाबाबत ग्रा.पं सदस्यांनी दिलेली लेखी तक्रार आणि ग्रामसेवक वाय एन पवार यांचा शासकीय कामात अनधिकृत गैरहजर असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली आहे. जेऊरवाडी ग्रा.पं.पाणीपुरवठा विहिरीच्या पाण्याची पातळी खालावली आहे. उपाययोजना आवश्यक होते.तसे आढळून येत नाही.ग्रामस्थांना शासकीय दाखले वेळेत न मिळणे,वेळेत पाणी न मिळणे,

योजनेपासून गावास वंचित ठेवणे, ग्रामसभा न घेणे, नागरिकांना आवश्यक कागदपत्रे विहित वेळेत प्राप्त करून न देणे,पाणीपट्टी,घरपट्टी वसुली न करणे,सतत अनधिकृत गैरहजर असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम शासकिय कर्तव्यात कसुर केल्यामुळे गटविकास अधिकारी यांनी दिनांक२९जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशानुसार शासकिय सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

वाय एन पवार यांच्या कामकाजाबाबत सदस्य व ग्रामस्थ यांनी तक्रार केली असुन त्यांचे कामकाज असमाधानकारक असुन त्याचा परिणाम हा ग्रामपंचायतीच्या विकास कामावर व प्रशासनावर होत असल्याने संबंधित ग्रामसेवकांना त्यांचे कार्यालयीन कामकाज यात सुधारणा व्हावी व गावांचा विकास करावा याबाबत त्यांना संधी देऊनही त्यात सुधारणा न झाल्याने शेवटचा पर्याय म्हणून त्यांना शासकिय सेवेतून निलंबित करण्यात आलेला आहे.

# बेरोजगार उमेदवारांसाठी ३१ जानेवारी रोजी विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय पुणे आणि लोकमंगल फाऊंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी बुधवार दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. पुणे विभागातील सदर विभागीय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात १० वी , १२ वी आयटीआय, डिप्लोमा, ग्रॅज्युएट कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशियन , नर्सिंग ,बी कॉम, एम कॉम ,एमबीए ,डी फार्म, आटी टेक्निशियन,बीबीए ,बी.पी.एड , एम.पी.एड, सहाय्यक शिक्षक अकाऊंटंट क्लार्क, ग्री डिप्लोमा , अशा विविध प्रकारची एकुण २ हजार ११७ पेक्षा जास्त रिक्तपदे पुणे विभागातील १९ उद्योजकांनी अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह बुधवार दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी सकाळ १०.०० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर रोड येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन पुणे विभागाच्या उपआयुक्त श्रीमती अनुपमा पवार यांनी केले आहे. याबाबत काही आडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१७ –२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीव्दारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , नॉर्थकोट , पार्क चौक सोलापूर येथे संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता प्र.सहायक आयुक्त श्री नलावडे यांनी केले आहे.

# वाहन कर न भरलेल्या जप्त वाहनांचा लिलाव

सोलापूर/प्रतिनिधीः मोटार वाहन कर न भरलेल्या व मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्यांतर्गत सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहने जप्त केली आहेत.

या जप्त करण्यात आलेल्या २४ वाहनांचा ई–लिलाव दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होणार असल्याची माहिती सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

सदर जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये बस, ट्रक, डी व्हॅन, पिकअप व्हॅन, टुरिस्ट टॅक्सी, ऑटोरिक्षा गुडस या वाहनांचा समावेश आहे.

जप्त वाहने चिंचोळी एम.आय.डी.सी येथील आवारात दि. ३१ जानेवारी ते दि. १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पाहणी करण्यासाठी उपलब्ध आहेत.

जाहिर ई–लिलावात सहभागी होण्यासाठी दि. ३१ जानेवारी ते दि. १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे खटला विभागात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रत्यके वाहनांसाठी ५० रूपये रकमेचा उध्र ठढज डजङ–झणठ या नावे अनामत रकमेचा डीमांड ड्राफ्टसह ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, नाव नोंदणी व कागदपत्रे पडताळणी अप्रुव्हल करून घेणे गरजेचे आहे.

लिलावाचे अटी व नियम दि.३० जानेवारी २०२४ पासून कार्यालयीन कामकाजाच्यादिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथील नोटीस बोर्डावर सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. सदर वाहने जशी आहेत तशी या तत्वावर जाहिर ई–लिलावाद्वारे विकली जातील.

कोणतेही कारण न देता सदर जाहिर लिलाव रद्द करण्याचे अथवा तहकूब ठेवण्याचे अधिकार प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

# सूर्या कंट्रक्शन च्या ऑफिसचे उद्घाटन प्रशांतराव परिचारक यांच्या शुभहस्ते



पंढरपूर/प्रतिनिधीः कन्ट्रक्शन ऑफिसचे उद्घाटन मा आ प्रशांतराव परिचारक मा कल्याणराव पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आलेसदर प्रसंगी मा प्रशांतराव परिचारक यांनी आपले मनोगत व्यक्त केले करताना दत्ता पाटील यांनी सुरुवातीच्या काळात प्रिंटिंग प्रेस चा व्यवसाय त्याला त्यावेळी फिटिंग ची कामे हाताने करावी लागत असत त्या काळात छोटी मोठी कामे करून व्यवसायात आपली प्रगती दाखवून स्थावर झाले त्याचबरोबर व्यवसाय अनेक प्रगती दाखवून दे स्थिर–सावर झाले वरचेवर व्यवसाय अनेक बदल होत गेले त्याप्रमाणे त्यांनी आपल्या व्यवसायात अनेक बदल केले व त्या आधुनिक तंत्रज्ञान आले व कम्प्युटर प्रिंटिंग प्रेस आले व तात्काळ कामे होऊ लागली त्याचप्रमाणे त्यांनी बदल करून प्रवाहाबरोबर आपल्या व्यवसायात बदल केला डिजिटल फिटिंगही त्यातलाच एक भाग आहे तोही त्यांनी आपला मोठा मुलगा शिव मेला याच व्यवसायात आणून डिजिटल युगाला पदार्पण करून पंढरपुरातील याही व्यवसायाचा प्रारंभ करून दत्त डिजिटल चे नाव नावावर रूपाला आणले

खरे तर आज अन्न वस्त्र निवारा असे प्रत्येकाला गरज आहे त्याचबरोबर सध्या कंट्रक्शन लाईफ फार मोठे महत्त्व आहे आज पंढरपुरात ११ मजली इमारतीच्या परवानगी आहे हीच गरज ओळखून बांधकाम व्यवसाय आपले आज प्रत्येक ठिकाणी बांधकाम क्षेत्रात अनेक बदल होत असतात अशा नवीन इंजिनियरची गरज आहे पंढरपुरात आता पूर्वीसारखे राहणीमान राहिले नाही नवीन पद्धतीने बांधकाम आणि नवीन नवीन सुविधाचा उपयोग करून नवीन नवीन सुख सुविधा देण्याच्या याने इंजिनिअरिंगचे नवीन आपले विचार ग्राहकांना सुखसुविधा नवीन देण्याचे काम नवीन इंजिनिअर करीत आहेत या व्यवसायात पदार्पण केले आहे पण त्यांनी या व्यवसायात सन्मानाने य प्रगती करावी ही अपेक्षा व्यक्त केली त्यांनी ग्राहकांना काय पाहिजे यांचा पुरेपूर अभ्यास करून या क्षेत्रात आपले नाव कमवावे ही अपेक्षा व्यक्त केली त्याला कुठलेही अडचण आपल्याला आपण त्यास सहकार्य करू असे आश्र्वासने दिले यावेळी नागेश काका भोसले यांनी बांधकाम व्यवसायावर आपले मनोगत व्यक्त केले हजार प्रसंगी अनेक मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला सदर प्रसंगी नागेश शाखा भोसले नगरसेवक इमरान मोहरी मनसेने दिलीप धोत्रे डीव्हीपी उद्योग समूहाचे कार्यकारी अधिकारी अमर पाटील महेश परिचारक युवा नेते प्रणव परिचारक शिवप्रेमी चे संस्थापक नानासाहेब कदम दिलीप गुरव नगरसेवक संजय निंबाळकर रामभाऊ सरोदे चैतन्य उत्पाद विश्र्वास पाटील पंढरपूर शहरातील सर्व संघटनेचे पत्रकार पंढरपूर मुख्य मुद्रक संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदार केसकर यांनी केली

# श्रीमती सुरेखा जाधव यांना पीएचडी पदवी प्राप्त

निफाडः निफाड महाविद्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती सुरेखा जाधव यांना नुकतीच अर्थशास्त्र विषयात पुणे विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त झाली असून, त्यांनी नाशिक जिल्ह्यातील शेती विकासात महिलांच्या योगदानाचे आर्थिकदृष्ट्या चिकित्सक अध्ययन(विशेष संदर्भ–नाशिक जिल्हा) या विषयावर संशोधन पूर्ण केले. त्यांना गाईड म्हणून प्रा. डॉ. आशालता सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.



बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. सुभाष पाटील हे ( एस एन डी टी विद्यापीठ मुंबई ) होते.त्याच्या या यशाबद्दल म. वि. प्र. समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे , चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष श्री विश्र्वासराव मोरे , संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे, नाशिक संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अमोल गायकवाड, आणि सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत...

# कळंब मध्ये पेट्रोल पंपावर कोयत्याचा धाक दाखवून सव्वातीन लाखाला लुटले

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील येरमाळा रस्त्यावरील हासेगाव ( केज) ग्रामपंचायत हद्दीतील राजश्री पेट्रोल पंपावर कोयत्याचा धाक दाखवून चार चोरट्याने ३ लाख २८ हजार रुपयाची रोकड लुटल्याची घटना घडली आहे. ही घटना रविवार तारीख २८ रात्री ११ वाजून ५२ मिनिटांनी घडली आहे. दरम्यान चोरट्याने अवघ्या चार मिनिटात पेट्रोल पंपावर दरोडा टाकून रोकड पळविल्याची घटना सीसी टीव्ही फुटेज वरून उघड झाली आहे. याप्रकरणी रात्री पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भगवान भंडारी यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. यात म्हटले आहे की येरमाळा रस्त्यावरील हासेगाव (के ) ग्रामपंचायत हद्दीत हिंदुस्तान पेट्रोल पंप आहे. रविवारी रात्री दुचाकी वरून चार दरोडेखोर हातात कोयते घेऊन ११ वाजून ५२ मिनिटांनी आले होते. कोयत्याचा धाक दाखवून पंपावरील कामगारांना ऑफिसच्या च्याव्याची मागणी केली. काही कामगारांनी च्याव्या तात्काळ न दिल्यामुळे कोयते उघारून धमकावण्यात आले. घाबरलेल्या अवस्थेत कामगारांनी च्याव्या दिल्या, ऑफिस मधील असलेल्या तीन कॅश काउंटर मधून चोरट्याने ३ लाख २८ हजार रुपये घेऊन दरोडा टाकला. कामगारांनी दरोडा टाकल्याची माहिती राजश्री पेट्रोल पंपाचे भगवान भंडारी यांना माहिती दिली. भंडारी यांनी तात्काळ पोलिस स्टेशनला संपर्क केल्यानंतर तात्काळ पोलीस दाखल झाले. दरम्यान कुणाची माहिती घेण्यासाठी तात्काळ अतिरिक्त पोलीस अधीक्षक गौर हसन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, पोलीस निरीक्षक सुरेश साबळे, आधी पोलीस कर्मचारी दाखल होऊन गुन्ह्याची माहिती घेतली, दरोडेखोर हे आपापसात मराठीत बोलत होते, दुचाकीवरून चार दरोडे खोर ११ वाजून ५२ मिनिटांनी आले,११ वाजून ५६ मिनिटांनी म्हणजे अवघ्या ४ मिनिटात सव्वातीन लाखाची रोकड लुटल्याची घटना पंपावरील सीसीटीव्ही फुटेज वरून स्पष्ट होत आहे. गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तैनात केली आहेत.

